# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १०/०३/२०२६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. १०/०३/२०२६ रोजी सभा सुचना क्र. ०२ दि. ०६/०३/२०२६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात दुपारी ३.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत | मा. सभापती |
| २ | श्री. पंकज सुर्यमणी पांडेय | सदस्य |
| ३ | श्री. दिपक कल्याणराव सावंत | सदस्य |
| ४ | श्री. विशाल जगन्नाथ पाटील | सदस्य |
| ५ | श्री. संजय अनंत थेराडे | सदस्य |
| ६ | श्री. आनंद दत्ताराम मांजरेकर | सदस्य |
| ७ | श्रीम. वंदना संजय भावसार | सदस्या |
| ८ | श्रीम. हेतल रतीलाल परमार | सदस्या |
| ९ | श्री. मनोज रामनारायण दुबे | सदस्य |
| १० | श्री. गणेश गोपाळ शेट्टी | सदस्य |
| ११ | श्री. अनिल रवजीभाई विराणी | सदस्य |
| १२ | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग | सदस्य |
| १३ | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| १४ | श्रीम. शर्मिला विन्सन बगाजी | सदस्या |
| १५ | श्री. जय राजेंद्र ठाकूर | सदस्य |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. नविन गुप्तेश्वर सिंग | सदस्य |

**महापालिका सचिव :-**

सर्व प्रथम सर्व स्थायी समिती सदस्य आणि सन्मा. सभापती यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. मा. सभापतींच्या परवानगीने सभेला सुरुवात करण्यात येत आहे. मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. १०/०३/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. सर्व प्रथम नवनिर्वाचित मा. सभापती व सर्व स्थायी समिती सदस्य यांचे मनपा प्रशासन आणि सचिव कार्यालयाच्या वतीने हार्दिक स्वागत आणि अभिनंदन करण्यात येत आहे. सन्मा. सभापती महोदय आजच्या सभेला संबोधीत करतील.

**मा. सभापती :-**

सर्वांना मनापासून नमष्कार, सभा सुरु करतो. अगोदर आमचे कुलदैवत, कुलदेवीला स्मरण करुन हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा व भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करुन मी आजच्या सभेसाठी सर्वांचे स्वागत करीत आहे. सर्वप्रथम मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सभापती म्हणून संधी दिल्या बद्दल हे देशाचे यशस्वी पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्र मोदीजी, महाराष्ट्र

राज्याचे आदरणीय दुरदर्शी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस साहेब व भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष आरदणीय श्री. रविंद्र चव्हाण साहेब आमचे नेते व ह्या शहराचे आमदार आदरणीय श्री. नरेंद्र मेहता साहेब, शहराचे प्रथम नागरीक मा. महापौर आदरणीय श्री. डिंपलजी मेहता जिल्हाध्यक्ष आदरणीय श्री. दिलीप जैनजी व भारतीय जनता पक्षाचे सर्वांचे आभारी आहे. आजच्या बैठकीत उपस्थित आयुक्त महोदय सर्व नवनिर्वाचित स्थायी सदस्यांचे मी स्वागत करतो तसेच ह्या सभेसाठी उपस्थित महापालिकेचे सर्व अधिकारी यांचे देखील मी स्वागत करतो. माझ्या सभापतीच्या कार्रकिंदीमध्ये मिरा भाईंदर शहरातील सर्व समाजाचे नागरीक व सर्व पक्ष यांना सोबत घेऊन शहराचा सर्वांगिन विकास करण्यासाठी व सर्व सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी मी नेहमी कटीबध्द राहील. मिरा भाईंदर शहरातील सर्वांगिण विकासासाठी आपण सर्वांचे अमुल्य सहकार्य व मार्गदर्शन आम्हाला लाभेल अशी मी अशा बाळगतो. सर्वांनी खेळीमेळीच्या वातावरणात व शांततेने सभा पार पाडण्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभेल ही आपल्याकडून अपेक्षा आहे आणि मना पासून सर्वांचे धन्यवाद. येणाऱ्या एका वर्षामध्ये आपण सर्व ह्या शहरासाठी काय करु शकतो आणि काय नाही करु शकतो यावर आपण चर्चा करणार आहोत. आपल्याला लोकांनी जी संधी दिलेली आहे आपण याच्यामध्ये एकटे काही करु शकत नाही सगळे मिळून करु म्हणजे कुठल्याही पक्षाचे असोत आणि सर्वांत महत्वाची गोष्ट याच्यामध्ये आहे की जे अधिकारी वर्ग आहेत यांचे सहकार्य लाभणे गरजेचे आहे आणि मला अपेक्षा आहे व मनापासून खात्री पण आहे की अधिकारी वर्ग ह्या आपल्या कामासाठी ह्या शहरासाठी नेहमी सहभागी राहणार आहेत आणि जे आपले ह्या समितीचे सदस्य आहेत ह्यांना मनापासून हात जोडून विनंती राहील की येणाऱ्या काळामध्ये आपल्या शहरासाठी काय करु शकतो चांगले काही घडवून आणू शकतो त्यामध्ये तुमचे सहभाग आणि सहकार्य कराल अशी माझी विनंती आहे. सचिव महोदयांना विनंती आहे की सभेची पुढची कार्यवाही सुरु करावी.

**श्रीप्रकाश सिंग :-**

सभापती साहब जो आपने अभी बोला आपको खुर्ची मिला इसके लिये आपका बहूत बहूत धंन्यवाद. आपके सभापती काल मे मिरा भाईंदरका विकास होगा ऐसा तो मुझे विश्वास ही है, कोविड के समय से लेके आज तक जो नगरपालिका मे भ्रष्टाचार हूवा है दिलीप ढोले, और खांबित साहब के कार्यकाल मे और भी जो ऑफीसर थे उनका बहूत सारा मेरे पास पुरावा है वह आनेवाले समय मे मै ओपन करुंगा। कोविड के टाईम मे जो यह लोगो ने जो भ्रष्टाचार किया है वो कोई बोलने वाली बात नही है वह जग जाहिर है १० रुपये का सामान १०० रुपये मे लिया गया बिचमे किसी कारन विषय शांत था क्यो की नगर पालिकामे कोई जवाब नही दिया जा रहा था उस टाईम नगर सेवको को कोई माहिती नही थी और किसी को कोई जवाब भी नही देते थे इतना बढा भ्रष्टाचार हूवा उसका कोई जवाब नही। आपके वक्त मे एसा कोई भ्रष्टाचार नही हूवा वो मुझे पुरा विश्वास है आप जरा ध्यान रखीये गा बहूत बहूत धन्यवाद।

**अनिल विराणी :-**

सभापती महोदय, आपल्या परवानगीने बोलतो, साहेब सर्वप्रथम मी तुमचे आणि सर्व सदस्यांचे धन्यवाद करतो अशा साठी की बऱ्याच वर्षानंतर आपल्याला इकडे संधी मिळालेली आहे आपली पहिली बैठक आहे. आमचे सभापती महोदय मा. हसमुख गेहलोत साहेब हे स्थायी समिती सभापती पदी त्यांची नियुक्ती झाल्या बदल उपस्थित सर्व स्थायी समिती सदस्यांच्या वतीने मी त्यांचे मनपुर्वक आभार व्यक्त करतो. आपला कार्यक्षम नेतृत्वामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकासाला निश्चित नवी गती मिळेल असा आम्हाला विश्वास आहे. शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आपण केलेले काम प्रेरणादायी राहील असा मला विश्वास आहे. स्थायी समिती ही महानगरपालिकेच्या आर्थिक व विकासाकडे नेण्याची अत्यंत महत्वाची समिती आहे म्हणून आजची बैठक आपण सर्वांनी मिळून खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडू असा मला विश्वास आहे आणि परत आपण जी जबाबदारी स्विकारलेली आहे त्याच्या बद्दल सदस्यांच्या वतीने मी तुमचे पुन:श्च अभिनंदन व्यक्त करतो धन्यवाद.

**अनिल सावंत :-**

काँग्रेस आणि शिवसेना यांचे मिरा भाईंदर शहरातर्फे नवनिर्वाचित सभापती आमचे मित्र हसमुख गेहलोतजी यांचे पक्षा तर्फे आम्ही हार्दिक अभिनंदन करतो पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

**शर्मिला बगाजी :-**

सभापती साहेब आपल्या परवानगीने बोलते, आपले सर्व समितीचे नवनिर्वाचित सदस्य आणि आपण नवनिर्वाचित सभापती आपले सर्वप्रथम अभिनंदन करते. ह्या शहराची महत्वाची अशी जबाबदारी आपल्या खांद्यावर पक्षाने आणि ह्या शहराने टाकलेली आहे. विरोधी पक्ष असो किंवा सत्ताधारी पक्ष असो आपण शहरासाठी काम करणारे लोक आहोत. एवढ्या वर्षात प्रत्येकाने योगदान दिलेले आहे आणि आपलेही योगदान ह्या शहराला मिळालेले आहे. तर पुढील वर्षभरामध्ये ह्या स्थायी समिती मधून चांगल अस काही भरीव काम आपल्या मार्फत व्हाव त्यासाठी आम्ही सदैव

आपल्या पाठीशी असू. तरीही काही विषया बाबत जेव्हाही मत मत्तांतर होईल किंवा काही विषय शहराच्या हिताचे असतील त्यावेळेला आम्ही विरोधा मध्ये असलो कमी असलो तरी हा विषय तुम्ही घेऊन आम्हाला पण बोलण्याची संधी द्यावी. कारण प्रत्येक शहराचं प्रतिनिधीत्व इथे सदस्य करत आहोत, आम्ही करत आहोत. शहराने आणि आमच्या प्रभागाने आम्हाला विश्वास दिलेला आहे म्हणून आम्ही इथे पोहोचलेलो आहोत तर हे पुर्ण वर्ष आपल्या अध्यक्षतेखाली चांगल्या प्रकारे व्हावं त्यासाठी आपल्याला आणि इथे असलेले आपले पानपट्टे साहेब, आयुक्त साहेब आणि इथले अधिकारी आपल्याला सहकार्य करतील आम्ही पण सहकार्य करुच. चांगल आणि पॉझिटीव्ह अस आपण शहराला एका उच्च स्थानावर नेण्याचे काम आपल्या मार्फत व्हाव एवढीच इच्छा आणि परत एकदा खुप खुप शुभेच्छा धन्यवाद.

**मा. सभापती :-**

सचिव महोदय विषयाला सुरुवात करावी.

**महापालिका सचिव :-**

सभापतीच्या परवानगीने, प्रकरण क्र. ०२, दि. ०४/०३/२०२६ रोजीच्या मा. विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**अनिल विराणी :-**

दि. ०४/०३/२०२६ रोजीच्या मा. विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**श्रीप्रकाश सिंग :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०२ :-**

दि. ०४/०३/२०२६ रोजीच्या मा. विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. ०४/०३/२०२६ रोजीच्या मा. विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल विराणी अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र.३, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागात, नागरी आरोग्य केंद्रामध्ये ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी, विविध विभागामध्ये कार्यरत ऑडिट लिपीक व पशुसंवर्धन विभागामध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्तीचे नविकरण करणेबाबत.

**दिपक सावंत :-**

सभापती महोदय, हा जो नविकरणाचा विषय आहे याच्यामध्ये प्रशासनाने जो गोषवारा सादर केलेला आहे कर्मचाऱ्यांचा त्यांचे जे वेतन आहे त्याच्यामध्ये तफावत दिसून येत आहे. त्याच बरोबर ह्यांनी जानेवारीमध्ये रिनिव्ह केलेले आहेत आणि एकाच दिवसाचा त्याला गॅप दिलेला आहे. हे कर्मचारी किती वर्षा पासून कार्यरत आहेत त्यांचे नेमके काय काम आहे, याच्यामध्ये आरोग्याचे पण कर्मचारी आहेत, ऑडिटचे पण आहेत, पशुवैद्यकिय पण आहेत व्यवस्थित त्यांचे सादर करावे असे मला वाटते.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती हसमुख गेहलोत साहेब व सर्व सदस्यांचे प्रशासना तर्फे सर्वांचे हार्दिक स्वागत करतो. येत्या वर्षभरात खेळीमेळीच्या वातावरणात प्रशासना मार्फत जी काही आपण चर्चा करु. आपली महानगरपालिकेची इमेज कशी राहील ह्या पध्दतीने आपण खेळीमेळीत चर्चा करुनच विषय घेत जावू. आपली इमेज त्याप्रकारची वाईट राहता कामा नये

त्या दृष्टीकोनातून सर्वांना शुभेच्छा देतो. आणि हा जो विषय आहे त्यामध्ये आपण ६-६ महिन्यांनी कर्मचारी घेत असतो. जवळ पास काही कर्मचारी ५ वर्षा पासून आहेत काही ८ वर्षा पासून आहेत असे टोटल ३४ कर्मचारी आहेत. ह्यांची दर ६-६ महिन्यांनी त्यांचे नविनीकरण करतो त्याला स्थायी समितीची मंजूरी लागते. हे अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी आहेत ते जवळ पास ८ ते १० वर्षा पासून काम करत आहेत. त्यामध्ये मेडिकल ऑफिसर ३ आहेत फार्मासिस्ट ३ आहेत जेनीएम ९ आहेत एनीएम १० आहेत एस.एस. नेक्टीशियन आहेत पॅथलॉजिस्ट आहेत वेटर्नी डॉक्टर आहेत ऑडिटचे ४ अधिकारी आहेत ह्यांची रितसर जाहिरात काढून त्यांची पद भर्ती केलेली आहे. त्यांना फक्त आपण कायम करु शकत नाही दर ६-६ महिन्यांनी एक दिवसाचा खंड देवून त्यांची नविन नियुक्ती करत असतो. ही प्रशासकीय बाब आहे दर ६ महिन्यांनी आपण हे करत असतो त्यामुळे नविन अशी काही बाब नाही अत्यावश्यक सेवा आहे आपले सर्व हॉस्पीटल जवळ पास १०-११ पीएससी आहेत २४ आरोग्य केंद्र आहेत ते रन करण्यासाठी आपल्याला हे आवश्यक आहे. मध्यंतरी इलेक्शनचा काळ होता त्यामुळे आपण मिटींग घेऊ शकलो नाही त्यांचा पिरेड संपलेला आहे आता तुमची मंजूरी झाल्या नंतर कार्योत्तर मंजूरी देवू शकतो.

**मा. सभापती :-**

आयुक्त महोदय, सदस्य महोदयांचे असे म्हणणे आहे आता हे २५ वे वर्ष आहे आपल्याला हे २५ वर्ष चांगल्या रितीने पार पाडून आपल्या महापालिकेवर कोणी आक्षेप किंवा आपल्यावर कोणी आक्षेप घेऊ नये. ह्यांचे म्हणणे कदाचित असे आहे की ही तुम्ही माहिती दिली आहे त्यामध्ये आम्हाला काही विरोध किंवा नाही करायचा हा विषय नाही सावंत साहेबांचे म्हणणे होते की गॅप दिला तो तांत्रिकबाबच्या हिशेबाने दिलं दुसर त्यांचे म्हणणे होते की जे टोटल तुम्ही करणार त्यात काही चुक आहे त्यात तुम्ही ९८ आहे हे ३४ आहेत यांची टोटल करणार तर ७५ यात कदाचित चुक झाली असेल ते आपण बघून परत फेरसादर करुन घ्यावे अशी आपणाला विनंती आहे.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

साहेब, ते ऑलरेडी काम करत आहेत.

**दिपक सावंत :-**

ते ऑरलेडी काम करत आहेत फक्त आपण त्यांची माहिती मागत आहोत.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

तुम्हाला ॲडिशनल माहिती नंतर देतो.

**मा. सभापती :-**

साहेब तुम्ही टोटल करत आहेत त्यात चुक आहे यामध्ये सावंत साहेबांनी निदर्शनात आणले की ह्या दोन तीन कर्मचाऱ्यांच्या पदांमध्ये जे इथे मेन्शन केले आहे ते वेगळ आहे आणि देत आहेत वेगळे. आम्हाला विरोध नाही तुम्ही फक्त फेरसादर करुन आणा त्यात फक्त ती दुरुस्ती आहे १६१ बोलत आहेत त्यात हे १६१ नाहीत कदाचित कमी आहे ७५ आहेत किंवा ८० आहेत ते आपण बघुन घ्यावे आम्हाला याच्यामध्ये कोणाची काही हरकत नाही. आरोग्याचा विषय आहे आपण हमी देतो आरोग्याचा विषय आहे आपल्या हितासाठी आहे ते करणे गरजेचे आहे त्यामध्ये काही विरोध नाही.

**शर्मिला बगाजी :-**

ठराव मांडण्याचा अगोदर एक सुचना आहे आपण बोलल्या प्रमाणे ५ वर्ष ह्या लोकांना मुदतवाढ देत असतो तुम्ही ६-६ महिन्यांनी देण्यापेक्षा तुम्हाला हे पद अत्यावश्यक आहेत ११ महिने यात १ दिवसाचा खंड देवून असे करावे. परत ६-६ महिन्यांनी हा विषय येत असतो सभापतींच्या परवानगीने जर होत असेल तर त्याच्यावर लक्ष द्यावे.

**दिपक सावंत :-**

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यात कर्मचाऱ्यांच्या वेतन रक्कमांमध्ये तफावत दिसून येत असल्याने दुरुस्तीसह फेरसादर करण्यात यावा, असा मी ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

सभापती महोदय याच्यामध्ये सावंत साहेबांनी जे सांगितलं तफावत याच्यामध्ये कुठे तफावत दिसून येते? इथे दिलेला पगार आणि ॲक्च्यूअल त्यांना मिळणारा पगार याच्यामध्ये तफावत आहे.

**मा. सभापती :-**

दोघामध्ये तफावत आहे टोटलमध्ये पण आहे.

**अनिल सावंत :-**

असे कर्मचारी कोण कोण आहेत व किती आहेत ?

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

आमच्या माहिती नुसार आम्ही व्यवस्थित दिलेले आहे.

**अनिल सावंत :-**

हा पगार तुम्ही डायरेक्ट देतात कॉंट्रॅक्टर मार्फत देत नाही.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

कर्मचाऱ्यांच्या अकाऊंटला डायरेक्ट जमा होतो. महानगरपालिका पगार देते. सन्मा. सावंत साहेबांचा विषय असेल तर आपण तपासून घेतो.

**शर्मिला बगाजी :-**

तुम्ही दोन्ही विषय मिक्स करत आहात टोटल मध्ये तफावत आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये तफावत आहे असे सांगितले आहे.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

कमी जास्त पगार देण्याचा काही प्रश्न नाही जाहिरातीमध्ये जो काही उल्लेख आहे त्यापध्दतीने ठोक मानधन देत असतो.

**अनिल सावंत :-**

सन्मा. सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे जर तस झालं असेल त्यामध्ये काही तरी तथ्य असेल असे जे कोणी ऑफीसर करत असतील त्यांच्यावर कारवाई करा आणि अहवाल पुढच्या मिटींगमध्ये सादर करा.

**शर्मिला बगाजी :-**

साहेब त्यांच्याकडे काही तरी पुरावे असतील.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

तपासून घेतो.

**अनिल विराणी :-**

तफावत असल्याबाबत ऑलरेडी आयुक्त महोदयांना पत्र दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

त्यामध्ये कदाचित एक मिस्टेक असते तर एक ऐरर असते मिस्टेक असते ते जाणून बूजून करत असतात आणि ॲरर असतो तो जाणून बूजून होत नाही तर कदाचित त्यांच्याकडून लेखा मध्ये किंवा कुठल्या ऑडिटमध्ये लिखाणा मध्ये टोटलमध्ये काही मिस्टेक झाली असेल तर ते फेर सादर करण्यात यावे.

**अनिल सावंत :-**

साहेब हे पशुवैद्यकिय अधिकारी सध्या काय काम करत आहेत ?

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

साहेब, आपल्याकडे २ हॉस्पीटल आहेत एक पुनम सागर इथे आहे आणि एक उत्तनला आहे.

**शर्मिला बगाजी :-**

उत्तनला ओपीडी कुठे आहे ?

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

ओपीडी नसली तरी त्यांचे सुपरव्हीजन आहे. तिथे ऑपरेशन करतो ते व्हिजीट करतात त्याचे रेकॉर्ड मेंटेन करतात.

**मनोज दुबे :-**

कभी डॉक्टर भी नही रहते।

**मा. सभापती :-**

मेरा ऐसा मानना है जब वो विषय वापीस आयेगा उसी मे आप कर के लेलो । सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागात, नागरी आरोग्य केंद्रामध्ये ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी, विविध विभागामध्ये कार्यरत ऑडिट लिपीक व पशुसंवर्धन विभागामध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्तीचे नविकरण करणेबाबत.

**ठराव क्र. ०२ :-**

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यात कर्मचाऱ्यांच्या वेतन रक्कमांमध्ये तफावत दिसून येत असल्याने दुरुस्तीसह फेरसादर करण्यात यावा, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिपक सावंत                    अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र.४, नगररचना विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत श्रीम. सावनी पाटील, सहा. विधी अधिकारी यांचे नियुक्तीचे नविकरण करणेबाबत.

**अनिल विराणी :-**

सभापती महोदय माझा अगोदर प्रश्न आहे गोषवाऱ्यामध्ये लिहीलेले आहे नगर रचना विभाग आणि खाली काही तरी विधी विभाग लिहीलेले आहे. मला हे कळत नाही की हे वेगळ आहे की एकच आहे ?

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो हा विषय एकच आहे विधी विभागाच्या अंडर खाली ते काम करतात तिथे एक डेप्युटेशन आपण नगर रचना विभागाला दिलेला आहे.

**मा. सभापती :-**

मागणी कोणाची आहे विधी विभागाची आहे की नगररचना विभागाची आहे ?

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

नगररचना विभागाची मागणी आहे. विधी विभागाकडे ३-४ लोक आहेत त्याच्या पैकी एक डेप्युटेशन आपण तिकडे पाठविलेला आहे.

**मा. सभापती :-**

आता मान्यता कोणाला द्यायची नगररचना की विधी विभाग ?

**सई वडके, विधी अधिकारी :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलते हा विषय श्रीम. सावनी पाटील, ॲडव्होकेट आहेत त्या विधी विभागामध्ये सध्या कार्यरत आहेत. आपण त्यांना अनधिकृत बांधकामा संदर्भात जे न्यायालयीन प्रकरणे होतात ती हाताळण्यासाठी आपण त्यांना इथे घेतलेले आहे. सध्या विधी विभागात कार्यरत आहेत आणि सर जे म्हणत होते नगर रचना विभाग तो विषय इथे नाही तो वेगळा लिगल असिस्टंट आहे त्यांचा विषय नाही.

**मा. सभापती :-**

मॅडम, आमच्या सदस्यांची मागणी अशी आहे त्यांचे म्हणणे आहे की ही मागणी कोण करत आहे. विधी विभाग मागणी करत आहे की नगररचना मागणी करत आहे ?

**सई वडके, विधी अधिकारी :-**

सॉरी विधी विभाग करत आहे ॲक्यूअली आस्थापना विभागा मधून थोड टायपिंग मिस्टेक झालेली आहे.

**मा. सभापती :-**

सदस्य महोदय, आस्थापना विभागामधून टायपिंग मिस्टेक झालेली आहे ह्या विषयाचे काय करायचे मॅडम ?

**सई वडके, विधी अधिकारी :-**

ऐक्स्टेंशन द्यावे.

**मा. सभापती :-**

ऐक्स्टेंशन द्यायला आम्हाला काही प्रॉब्लेम नाही आता तुम्ही विधी विभागामध्ये आहेत आम्ही काय लिहायचे नगररचना हिशेबाने लिहायचे की काय लिहायचे ?

**सई वडके, विधी अधिकारी :-**

विधी विभाग.

**अनिल विराणी :-**

मॅडम आपण एक काम करा दुरुस्ती करुन परत पाठवा.

**मा. सभापती :-**

फेर सादर करा. आम्हाला काही हरकत नाही ठरावामध्ये तस मेंशन करा.

**अनिल विराणी :-**

ठराव मांडताना कोणी तरी साईन करेल तो पेपरवर्क करेल.

**सई वडके, विधी अधिकारी :-**

जे स्पष्टीकरण विभाग देत आहे त्यासाठी माफी असावी.

**अनिल विराणी :-**

मी प्रश्न विचारला त्याचे उत्तर काय आहे ?

**मा. सभापती :-**

मॅडमने सांगितलं की ते विधी विभागाचे आहे. मान्यता द्यायला काही हरकत नाही.

**दिपक सावंत :-**

मॅडम हे तुम्ही वाचले आहे का मला याच्यात काही चुक वाटत नाही तुम्ही नगर रचनेला सहाय्यक विधी अधिकारी नियुक्त करत आहात ?

**सई वडके, विधी अधिकारी :-**

साहेब, तस नाही मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये होणारे अतिक्रमण अनधिकृत बांधकामे आहेत आणि क्लस्टर संदर्भात जे काही न्यायालयीन प्रकरणे होतील ती प्रकरण हाताळण्यासाठी सहा. विधी अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक होत म्हणून हे झालेलं आहे हे कुठल्या स्पेसिफीक नगररचना विभाग वगैरे नाही. न्यायालयीन प्रकरण हे विधी विभागा मार्फत हाताळले जातात त्यासाठी आहे.

**अनिल विराणी :-**

हे केव्हा पासून कार्यरत आहेत ?

**सई वडके, विधी अधिकारी :-**

२०२४ पासून कार्यरत आहेत.

**अनिल सावंत :-**

हे विधी अधिकारी फुल टाईम आहे का ?

**सई वडके, विधी अधिकारी :-**

हो फुलटाईम आहे.

**दिपक सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार श्रीम. सावनी पाटील, सहा. विधी अधिकारी या नगररचना विभागात कार्यरत नसून त्या कार्यरत असलेल्या विभागासह सदरचा विषय फेरसादर करावा, असा मी ठराव मांडत आहे.

**वंदना भावसार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ०४ :-**

नगररचना विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत श्रीम. सावनी पाटील, सहा. विधी अधिकारी यांचे नियुक्तीचे नविकरण करणेबाबत.

**ठराव क्र. ०५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार श्रीम. सावनी पाटील, सहा. विधी अधिकारी या नगररचना विभागात कार्यरत नसून त्या कार्यरत असलेल्या विभागासह सदरचा विषय फेरसादर करावा, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिपक सावंत** **अनुमोदन :- श्रीम. वंदना भावसार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०५, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विंधन विहिरी (Borewell) ची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे.(कुपनलिका/विंधन विहिरी बांधणे) निविदेस मान्यता देणेबाबत.

**मा. सभापती :-**

खांबित साहेब, फक्त एवढी माहिती पाहिजे होती की याच्यामध्ये एकुण विहीरी किती आहेत ?

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

मा. सभापती यांच्या परवानगीने बोलतो, हा जो प्रस्ताव आहे बोरलेव त्याला विंदन विहीरी बोलतात आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १४२ विहिरी आहेत.

**मा. सभापती :-**

त्याला खर्च लागणार आहे किंवा मेंटेन करण्यासाठी हा खर्च आहे असे तुमचे म्हणणे आहे.

**संजय थेराडे :-**

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च (GST वगळून) | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | २०२५_ MBMC_ १२५७२१३_१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विंधन विहिरी (Borewell) ची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | रू ३२,९२,२७०/- | श्री. प्रदिप विकास वाघमारे | अंदाजपत्रक दर |

वरील प्रमाणे निविदेस मा. आयुक्त यांनी लघुत्तम निविदाधारक श्री. प्रदिप विकास वाघमारे यांची अंदाजपत्रक दराची निविदा (जी.एस.टी. वगळून) स्विकारण्यास दिलेल्या मान्यतेनुसार ही सभा मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**पंकज पांण्डेय :-**

माझे अनुमोदन आहे.

**संजय थेराडे :-**

ह्या विषयाला धरुन मला एक सुचना करायची होती माझ्या प्रभागात घोडबंदर गाव काशी गांव त्याच बरोबर विविध शहरात त्या मागण्या आहेत जो पाण्याचा तुटवडा आहे त्यासाठी विहिरी बांधायच्या. त्या १४२ विहीरींसाठी आपण देखभाल दुरुस्तीसाठी ही निविदा मागवतोय त्यात नविन मागणी जर येत असेल त्यासाठी आपण काही करु शकतो का ? त्याला तहसिलदाराची परवानगी लागते ती परवानगी देण्यात यावी.

**मा. सभापती :-**

बोरवेलचा विषय आहे सदस्याची मागणी जी आहे ती सुचना चांगली आहे सध्या हा विषय इथला नाही हा विषय आपण महापौरांना सांगूण आणि गरज पडल्यास संबंधित विभागाला ज्याठिकाणी गरजेचे आहे ते आपण करायला लावूया.

**अनिल सावंत :-**

सभापती साहेब, १४२ बोरवेल ज्या आहेत त्या कुठे आहेत ? त्या बिल्डींग परिसरात तर नसतील.

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

काही ठिकाणी आहेत.

**अनिल सावंत :-**

कुठे आहेत?

**मा. सभापती :-**

यादी आहे.

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

१४ नंबर प्रभागात डोंगरी ते उत्तन, आपल्या ऑफिसच्या शेजारी त्याची यादी मी आपल्याला पाठवतो.

**अनिल सावंत :-**

सर्व चालू आहेत का ?

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

हो सर्व चालू आहेत.

**अनिल सावंत :-**

पाणी कुठच येते, गोड पाणी येते ?

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

गोड पाणी येते.

**अनिल सावंत :-**

बोरवेलला मेंटेनस म्हणजे आपण मागणी काय करतो रिपेरींग तर ते होऊ शकत नाही.

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

आपल्याकडे एक व्हेईकल आहे चार ठिकाणी प्लंबर गाडी असते. आपला आयटम रेट मंजुर असतो साहेब दर वर्षी रिपेरींग करतो म्हणून तो आम्ही खर्च टाकलेला आहे.

**प्रकरण क्र. ०५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विंधन विहिरी (Borewell) ची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे.(कुपनलिका/विंधन विहिरी बांधणे) निविदेस मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ०६ :-**

| **अ. क्र** | **टेंडर आय डी** | **कामाचे नाव** | **अंदाजित खर्च** (GST वगळून) | **निविदाधारकाचे नाव** | **सादर केलेला दर** |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | २०२५_ MBMC_ १२५७२१३_१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विंधन विहिरी (Borewell) ची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | रू ३२,९२,२७०/- | श्री. प्रदिप विकास वाघमारे | अंदाजपत्रक दर |

वरील प्रमाणे निविदेस मा. आयुक्त यांनी लघुत्तम निविदाधारक श्री. प्रदिप विकास वाघमारे यांची अंदाजपत्रक दराची निविदा (जी.एस.टी. वगळून) स्विकारण्यास दिलेल्या मान्यतेनुसार ही सभा मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. संजय थेराडे** **अनुमोदन :- श्री. पंकज पांण्डेय**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०६, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनिःसारण केंद्र क्र. ६A, ६B, ६C व 7 मधील पंपाची दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे करणे (जल ही अमृत उपक्रमांतर्गत मलनिःसारण केंद्र दुरुस्ती) निविदेस मान्यता देणेबाबत.

**अनिल विराणी :-**

सभापती महोदय, याच्यामध्ये एकूण किती पंप आहेत त्याची माहिती आम्हाला द्यावी. एस.टी.पी. मध्ये किती पंप आहेत ?

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

४ आहेत.

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

आपला ६ जे एस.टी.पी. आहे त्याच्यामध्ये २५ एस.पी. चा एक आहे, ४५ एस.पी. चा आहे.

**अनिल विराणी :-**

गोषवाऱ्यात सविस्तर आणले पाहिजे होते.

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

आपले जे एसटीपी आहेत ते २००९-१० मध्ये सुरु झालेले आहेत त्यांना जवळ जवळ १६ वर्ष झालेली आहेत. आणि ह्याच्यामध्ये जे काही रिपेरींग पंप वगैरे नेहमी बंद होतात त्याप्रमाणे आपण ऑडिट करुन त्याचे हे केले आहे आणि हे काम करण्या करीता आपल्याला १०० टक्के जल ही अमृत याच्यासाठी शासनाचा निधी आहे आपला नाही त्याच्यातुन आपण हे कामे घेतलेली आहेत.

**मा. सभापती :-**

सदस्यांचे म्हणणे असे आहे की तुम्ही हे जे पैसे ह्या अ,ब,क,अ-७ पंपाची दुरुस्ती साठी खर्च करणात त्या पंपाची कॉस्ट किती आहे आणि दुरुस्ती किती आहे याची माहिती दिली तर बर होईल. याच्यामध्ये ते क्लेरीफिकेशन नाही याच्यामध्ये डायरेक्टली मेंशन केलेले आहे.

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

इस्टीमेट करुन सॅक्शन घेवून गेले आहे.

**मा. सभापती :-**

तो विषय वेगळा आहे सॅक्शन घेऊन गेले आहेत आम्ही त्याला नाकारत नाही.

**अनिल विराणी :-**

सभापती महोदय मी ह्याच्या साठी विचार आहे की हे जे एसटीपी आहेत माझ्या प्रभागात २ आहेत. त्याबाबत नेहमी तक्रार येतात त्याच्यामध्ये किती एच.पी. ची मोटर आहे किती वर्ष जूनी आहे मागच्या वर्षी काय मेंटेनस केला त्याची माहिती मागितली.

**मा. सभापती :-**

साहेब, सदस्यांचे म्हणणे असे आहे तो जो तुम्ही खर्च दाखवतात तो खर्च मशीन पेक्षा जास्त नको असे होऊ नये.

**अनिल विराणी :-**

तो १० वर्ष जुना जर पंप असेल त्याच्यामध्ये एवढा खर्च करु नका आपण नविन घेऊ अजुन १० वर्ष चालेल.

**मनोज दुबे :-**

जे कामगार आहेत तो स्व:त बोलतो की हे जुने पंप आहे तो बरोबर काम करत नाही। २० एचपी का है तो वो ४० चाहिये।

**मा. सभापती :-**

उसे वापीस से लाने के लिये बोलो.

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

वोभी सुरु है अभी कंसल्टंट अपॉईंट किया है वह डीपीआर बना रहा है १५० होल्ट का पंप लगायेंगे पैसे नही थे कर के हम कर नही रहे थे अभी हम शासन को भेजा है हमने यह काम दिया है।

**मनोज दुबे :-**

सेक्टर ८ मे आज भी पुरा पाणी ओवर फ्लो हो रहा है। उन लोगो का कहना है पंप बरोबर काम नही कर रहा है।

**मा. सभापती :-**

ठिक आहे ठराव करा.

**आनंद मांजरेकर :-**

| अ.क्र. | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च (GST वगळून) | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | २०२५_ MBMC_ १२५१०८७_१ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनि:सारण केंद्र क्र.६A, ६B, ६C व ७ मधील पंपाची दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे करणे | रू. १,००,२५,७९०/- | मे.इन्व्हायरोकेम इंटरप्रायजेस | अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२५% कमी दराने |

प्रशासनाने गोषवारामध्ये पंपाची दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे बाबतच्या सविस्तर माहितीसह प्रस्ताव फेरसादर करावा, असा मी ठराव मांडत आहे.

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे हे मान्यता देवून सविस्तर माहिती सादर करावी की फेटाळून सादर करावी ?

**मनोज दुबे :-**

फेटाळून सादर करावी.

**अनिल सावंत :-**

सभापती साहेब, हे जे एसटीपी प्लांट आहेत त्याच्यात एक लाला हजरत येथे प्लांट आहे तिथे आता अधिकारी आहे का? तो शंभर टक्के प्लांट चालू आहे का ?

**शरद नानेगावकर :-**

हो चालू आहे.

**अनिल सावंत :-**

तो जर प्लांट चालू असेल तर तिकडील आजु बाजूच्या ज्या सोसायटीज आहेत त्या किती टक्के सोसायटींना आपण प्रॉपर्टी कनेक्शन दिलेले आहे ?

**शरद नानेगावकर :-**

प्रॉपर्टी कलेक्शन सर्व्हे सध्या चालू आहे.

**अनिल सावंत :-**

प्लांट सुरु होऊन किती दिवस झाले ?

**शरद नानेगावकर :-**

२००९ चा प्रोजेक्ट आहे १७ वर्ष झाले.

**अनिल सावंत :-**

प्लांट पुर्ण होऊन किती वर्ष झाली ?

**शरद नानेगावकर :-**

१७ वर्ष झाली.

**अनिल सावंत :-**

१७ वर्षा मध्ये आपण त्या आजुबाजूच्या सोसायटींना कनेक्शन का दिले नाहीत ?

**शरद नानेगावकर :-**

गॅप वर्क बाकी आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे तुमचे काम चालू नाही. तुम्ही अशी माहिती देवू नका की काम पुर्ण झालेले आहे.

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

साहेब, काम पुर्ण आहे त्याला शंभर टक्के कनेक्शन दिलेले आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे साहेब अपुर्ण आहे आपण प्रॉपर्टी कनेक्शन का दिले नाही ? तुम्ही लोकांकडून पैसे घेतलेले आहेत २००८ पासून तुम मलप्रवाह शुल्क ८ टक्के कर घेत आहेत. काही ठिकाणी प्रॉपर्टी कनेक्शन चे पैसे घेतलेले आहेत, मग कनेक्शन का नाही दिले प्रश्न तो आहे. आज परिस्थिती एवढी भयानक आहे साहेब तुम्हाला माहित आहे त्यांचे जे सेप्टीक टँक असतात ते क्लिन करायला आपल्या जवळ जागा चांगली नाही.

**दिपक खांबित, शहर अभियंता :-**

साहेब, आपली अंडर ग्राऊंड सिवरेज स्कीम सुरु आहे जी एसटीएमएल करतो त्याच्यामध्ये त्यांची अजुन २ कि.मी. ची लाईन टाकायची बाकी आहे जे जंक्शन पॉईंट आहेत तेवढच सुध्दा काम बाकी आहे जिकडे आता दिपक हॉस्पीटलचा मेन रस्ता आहे तिकडे सिवरेज लाईन टाकायची बाकी आहे ती टाकली तर तो जो फ्लो आला हजरतचा त्या एसटीपी मध्ये जावू शकेल.

**अनिल सावंत :-**

आला हजरतचा जो एसटीपी प्लांट आहे त्याची कॅपॅसिटी किती आहे ? दिपक हॉस्पीटल रोडची लाईन तुम्ही एकडे रोड क्रॉस करुन इकडे आणत आहेत अजुन इथल्या इमारतींना अजुन त्यांनी कनेक्शन दिले नाहीत. त्या बाजुच्या इमारतींची कंडीशन जावून बघा ते लोक फ्लॅट विकून जात आहेत तिथे राहू शकत नाहीत खुप घाण वास येतो. तिथे लहान मुले खेळू शकत नाहीत. गार्डन मध्ये तुमचा प्लान टाकला तिथल्या लोकांना प्रॉपर्टी कनेक्शन न देता तुम्ही समोरच्या लाईनचे इकडे घेऊन येत आहेत. उद्या रिडेव्हलपमेंट झाल्या नंतर तिथे मोठमोठे टॉवर्स येणार आहेत त्यांना कुठून तुम्ही फॅसिलीटी देणार आहेत ?

**मा. सभापती :-**

खांबित साहेब, तुम्ही काय करा सावंत साहेबांचे जे काही प्रश्न आहेत प्रत्यक्ष त्यांना बोलवून गरज पडली तर जागेवर जावून पाहणी करुन आणि संबंधित जे कोणी अधिकारी आहेत त्याच्या वर निर्णय घ्या. सचिव महोदय पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनिःसारण केंद्र क्र. ६A, ६B, ६C व ७ मधील पंपाची दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे करणे (जल ही अमृत उपक्रमांतर्गत मलनिःसारण केंद्र दुरुस्ती) निविदेस मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ०५ :-**

| **अ.क्र.** | **टेंडर आय डी** | **कामाचे नाव** | **अंदाजित खर्च** (GST वगळून) | **निविदाधारकाचे नाव** | **सादर केलेला दर** |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | २०२५_ MBMC_ १२५१०८७_१ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनि:सारण केंद्र क्र.६A, ६B, ६C व ७ मधील पंपाची दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे करणे | रू. १,००,२५,७९०/- | मे.इन्व्हायरोकेम इंटरप्रायजेस | अंदाजपत्रक दरापेक्षा ०.२५% कमी दराने |

प्रशासनाने गोषवारामध्ये पंपाची दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे बाबतच्या सविस्तर माहितीसह प्रस्ताव फेरसादर करावा, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. आनंद मांजरेकर अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०७, महापालिकेच्या महापौर दालनाकरीता वर्ग-०१ व वर्ग-०२ चे निवृत्त अधिकारी यांची मानधनावर ओ.एस.डी. व पी.एस. म्हणून नेमणूक करणेबाबत.

**दिपक सावंत :-**

महापौर दालनामध्ये दररोज विविध प्रशासकीय समन्वयक व जनसंपर्काशी संबधित कामकाज मोठ्या प्रमाणावर पार पाडण्यात येत असते. नागरिकांच्या तक्रारी, लोकप्रतिनिधीशी समन्वये, विविध विभागांकडून येणारे प्रस्ताव, महासभा आढावा बैठक, तसेच तातडीच्या प्रशासकीय बाबीवर त्वरित निर्णयासाठी आवश्यक असलेले कागदपत्रीय कामकाज नियमितपणे हाताळावे लागते. याकरीता वर्ग-०१ व वर्ग-०२ चे दोन अनुभवी निवृत्त अधिकारी यांची ओ.एस.डी व पी.एस म्हणून नेमणूक करणेबाबत दि.२३/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मा.महापौर यांनी कळविलेले आहे.

यावरुन कामांची व्यग्रता व व्याप्ती लक्षात घेता त्वरीत कामाचा निपटारा करणेकरीता अनुभवी ओ.एस.डी व पी.एस यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. प्रशासनाने ठरविलेले मानधन हे योग्य नसून त्यामुळे अनुभवी अधिकारी उपलब्ध होणार नाहीत, अन्यथा मनपा आस्थापनावरील वर्ग-०१ व वर्ग-०२ दर्जाचे अनुभवी अधिकारी द्यावे लागतील आस्थापनेवर अपुरा अधिकारी वर्ग असल्यामुळे ते शक्य होणार नाही. म्हणून यापुर्वी मनपामार्फत स्थानिक संस्था कर

विभागात करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. सध्या अतर्गंत लेखा परिक्षण विभागात सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली असून वेळोवेळी त्यांना मुदतवाढही देण्यात आलेली आहे.

याच धर्तीवर मनपाच्या महापौर दालनात ओ.एस.डी व पी.एस वर्ग-०१ व वर्ग-०२ चे दोन निवृत्त अधिकारी यांचे प्रति माह रु. ४०,०००/- मानधन ठरवून त्यांची नियुक्ती करणेकरीता जाहिरात प्रसिध्द करुन मुलाखत घेणेस (Walk in interview) ही सभा मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब, महापौर प्रथम नागरीक पुर्ण शहरामध्ये २४ प्रभागांमध्ये त्यांच लक्ष असतं काम व्हायला पाहिजे पालिकेमध्ये असे कोणतेही सक्षम अधिकारी नाहीत का ?

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

स्टाफ कमी आहे अधिकारी आहेत.

**अनिल सावंत :-**

सक्षम अधिकारी नाहीत का ?

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

सक्षमचा विषय नाही अधिकारी वर्ग कमी आहेत २५०० हजार स्टाफ मंजुर आहे सध्या अधिकारी २५ आहेत १३०० अजुन सध्या पद रिक्त आहेत.

**अनिल सावंत :-**

६० वर्षा नंतर माणसाने रिटायर्ड घ्यायला पाहिजे का घ्यायला पाहिजे कारण त्याची निर्णय घेण्याची क्षमता कमी झालेली असेल शारिरीक क्षमता कमी झालेली असेल.

**मा. सभापती :-**

सावंत साहेब, असे भरपुर अधिकारी आहेत ते सेवानिवृत्त झाल्या नंतरही त्यांना परत अपॉईंट करण्यात आलेले आहे. आपले अधिकारी सक्षम आहेत.

**अनिल सावंत :-**

सभापती साहेब आपण ह्याठिकाणी पद निर्मिती करतो ओएसडी आणि पीएससी पद निर्मिती करतो.

**मा. सभापती :-**

पद निर्मिती करत नाही.

**अनिल सावंत :-**

हे आपलं वर्धापण वर्ष आहे महापौरांना भरपुर काम असणार आहेत भरपुर निर्णय घ्यायचे आहेत माझ एकच होत की गव्हर्नमेंटने एक ठरविलेले आहे की ६० वर्षा मध्ये माणूस रिटायर्ड व्हायला पाहिजे. कदाचित त्याची निर्णय घेण्याची क्षमता कमी झाली असेल शारीरिक क्षमता कमी झालेली असेल...........

**संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त :-**

सभापतीच्या परवानगीने बोलतो शासनाचा जीआर आहे घेऊ शकतो.

**मा. सभापती :-**

सावंत साहेबाला विनंती आहे की कुठल्याही सेवानिवृत्त अधिकाऱ्याला तुम्ही अस बोलू नका की निर्णय घेऊ शकत नाही किंवा शारीरिक कमजोर आहे इन डायरेक्टली तुम्ही आक्षेप घेऊ नका.

**अनिल सावंत :-**

महापौरांना एक चांगला सक्षम अधिकारी द्यावा त्यांच्या जागेवर ह्या लोकांना घ्या कुठे घ्यायचे असेल ते.

**शर्मिला बगाजी :-**

पीएस हे पद बरोबर आहे परंतु ओएसडी खुप मोठे पद आहे.

**मा. सभापती :-**

काही मोठ पद नाही म्हणजे निरिक्षक त्याला ऑफीसर पोलीस अधिक्षक म्हणजे सुप्रीटेंडन कहा तो पोलीस के लिये अच्छा लगता है परंतु वॉर्डन मे डॉक्टर्स डिपार्टमेंट मे या इंजिनियर डिपार्टमेंट मे तो उसको उसके साथ तुलना ना करे

डॉक्टर एमएस भी होते है डॉक्टर फिजिशियन भी होते है डॉक्टर कार्डियो भी होते है त्या नावावर किंवा पदावर न जाता आपण करत आहोत ही फक्त काळाची गरज आहे म्हणून त्या हिशेबाने करत आहोत. सचिव महोदय पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०७ :-**

महापालिकेच्या महापौर दालनाकरीता वर्ग-०१ व वर्ग-०२ चे निवृत्त अधिकारी यांची मानधनावर ओ.एस.डी. व पी.एस. म्हणून नेमणूक करणेबाबत.

**ठराव क्र. ०६ :-**

महापौर दालनामध्ये दररोज विविध प्रशासकीय समन्वयक व जनसंपर्काशी संबधित कामकाज मोठ्या प्रमाणावर पार पाडण्यात येत असते. नागरिकांच्या तक्रारी, लोकप्रतिनिधीशी समन्वये, विविध विभागांकडून येणारे प्रस्ताव, महासभा आढावा बैठक, तसेच तातडीच्या प्रशासकीय बाबीवर त्वरित निर्णयासाठी आवश्यक असलेले कागदपत्रीय कामकाज नियमितपणे हाताळावे लागते. याकरीता वर्ग-०१ व वर्ग-०२ चे दोन अनुभवी निवृत्त अधिकारी यांची ओ.एस.डी व पी.एस म्हणून नेमणूक करणेबाबत दि.२३/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मा.महापौर यांनी कळविलेले आहे.

यावरुन कामांची व्यग्रता व व्याप्ती लक्षात घेता त्वरीत कामाचा निपटारा करणेकरीता अनुभवी ओ.एस.डी व पी.एस यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. प्रशासनाने ठरविलेले मानधन हे योग्य नसून त्यामुळे अनुभवी अधिकारी उपलब्ध होणार नाहीत, अन्यथा मनपा आस्थापनावरील वर्ग-०१ व वर्ग-०२ दर्जाचे अनुभवी अधिकारी द्यावे लागतील आस्थापनेवर अपुरा अधिकारी वर्ग असल्यामुळे ते शक्य होणार नाही. म्हणून यापुर्वी मनपामार्फत स्थानिक संस्था कर विभागात करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. सध्या अतर्गत लेखा परिक्षण विभागात सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली असून वेळोवेळी त्यांना मुदतवाढही देण्यात आलेली आहे.

याच धर्तीवर मनपाच्या महापौर दालनात ओ.एस.डी व पी.एस वर्ग-०१ व वर्ग-०२ चे दोन निवृत्त अधिकारी यांचे प्रति माह रु. ४०,०००/- मानधन ठरवून त्यांची नियुक्ती करणेकरीता जाहिरात प्रसिध्द करुन मुलाखत घेणेस (Walk in interview) ही सभा मान्यता देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिपक सावंत          अनुमोदन :- श्री. मनोज दुबे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०८, <u>मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या निविदेचे अवलोकन करणे.</u> - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. ३०५, ३१४, २५५, २६९, २३५ इ. ठिकाणी असलेल्या योगाशेड करीता विद्युत विषयक कामे करणे.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०८ :-**

<u>मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या निविदेचे अवलोकन करणे.</u> - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. ३०५, ३१४, २५५, २६९, २३५ इ. ठिकाणी असलेल्या योगाशेड करीता विद्युत विषयक कामे करणे.

**ठराव क्र. ०७ :-**

| | | |
|---|---|---|
| १) | कोटेशन निविदा कालावधी | दि. ११/०२/२०२६ ते दि. २४/०२/२०२६<br>निविदा सुचना क्र. १९ |
| २) | लेखाशिर्षक | उद्याने (नविन विद्युत कामे) |
| ३) | प्रशासकिय व आर्थिक मंजुरी | दि. १०/०२/२०२६ |
| ४) | मा. निविदा समिती शिफारस दिनांक | दि. २७/०२/२०२६ |
| ५) | मा. आयुक्त यांची निविदा दरास मान्यता दिनांक | दि. २८/०२/२०२६ |

| अ.क्र. | कोटेशन क्र. | कामाचे नाव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर (जी.एस.टी. वगळून) |
|---|---|---|---|
| १. | **९९** | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र. ३०५, ३१४, २५५, २६९, २३५ इ. ठिकाणी असलेल्या योगाशेड करीता विद्युत विषयक कामे करणे. | **रु. ६,३४,१४९/-** |
| | | मे. क्लासिक वर्क्स | ०.५ % कमी दराने |
| | | मे. रूद्रा इनोटेक | १.०० % जास्त दराने |
| | | मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल सोल्युशन इंडिया प्रा.लि. | १.२५ % जास्त दराने |

वरील प्रमाणे निविदेस मा. आयुक्त यांची लघुत्तम निविदाधारक मे. क्लासिक वर्क्स यांची ०.५ % कमी दराने निविदा जी.एस.टी सह स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार सदर कामाचे अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ९, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणेबाबत. (अ (सर्वसाधारण) + क (पाणी पुरवठा)) आणि प्रकरण क्र. १० परिवहन सेवेचे सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणेबाबत. (ब - अंदाजपत्रक)

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती व सर्व स्थायी समिती सदस्य, मिरा भाईंदर महानगरपालिकेमधील प्रशासकीय कार्यकाळानंतर नवनियुक्त मा. स्थायी समितीपुढे अर्थसंकल्प सादर करताना मला खूप आनंद होत आहे. मिरा भाईंदर शहराचा अर्थसंकल्प सादर करताना या शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी व देश पातळीवर नावलौकीक मिळविण्यासाठी सन्माननीय महापौर व सदस्य यांच्या सहकार्याने नवीन आर्थिक वर्षामध्ये जोमाने काम करावे लागणार आहे.

अर्थसंकल्प हा केवळ आकड्याचा खेळ नसून यामधून मिरा-भाईंदर शहराच्या विकासाचा आराखडा, शहराच्या उज्ज्वल भविष्याची दिशा आणि नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचा दृढ संकल्प आहे. गेल्या वर्षभरात महानगरपालिकेने पारदर्शक प्रशासन, लोकसहभाग व कार्यक्षम नियोजन याच्या माध्यमातून व प्रयत्नामुळे मिरा भाईंदर शहराला स्वच्छ सर्वेक्षणामध्ये देशात प्रथम क्रमांकाचा मान मिळाला आहे. तसेच भारतातील अग्रगण्य क्रिसिल रेटिंग कंपनीकडून मिरा भाईंदर महानगरपालिकेला 'A' असे पतमानांकन प्राप्त झालेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने पायाभूत सुविधाव्यतिरिक्त डिजीटायजेशन अंतर्गत विविध सेवा या ऑनलाईन केल्या असून या माध्यमातून प्रशासन ते नागरिक तसेच नागरिक ते नागरिक व व्यापारी / व्यावसायिक ते नागरिक यातील अंतर कमी होऊन नागरिकांना महानगरपालिकांच्या सेवांचा घरबसल्या लाभ घेणे सोयीचे झाले आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सर्व विभागांशी विचारविनिमय करून विभागप्रमुख यांनी वेळोवेळी लेखी व मौखिकरित्या उपलब्ध करून दिलेल्या आकडेवारीवरून तरतुदी निश्चित केलेल्या आहेत. केंद्र शासन व राज्यशासनाच्या धोरणानुसार नॅशनल अकाऊंट मॅन्युअलनुसार लेखाशीर्षे तयार करण्यात आलेली असून या अर्थसंकल्पातील पूर्वीची काही लेखाशीर्ष कमी केलेली असून काही लेखाशीर्षांचे एकत्रीकरण व विलगीकरण करण्यात आले असून काही लेखाशिर्ष नव्याने करण्यात आलेली आहेत.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे स्वनिधीचे "अ" अंदाजपत्रक रु.१२०४.१७ कोटी, "क" अंदाजपत्रक रु.२३४.८४ कोटी असे एकूण रु.१४३९.०२ कोटीचे अर्थसंकल्पीय अंदाज मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

स्वच्छ सर्वेक्षणात मिळालेल्या देशात प्रथम स्थानानंतर आता आमचे ध्येय "स्वच्छ शहरातून शाश्वत शहराकडे" असे आहे. यासाठी पुढीलप्रमाणे उपक्रम राबविण्याचा प्रयास आहे.

**१. सार्वजनिक बांधकाम विभाग :-**

शहरी पायाभूत सुविधा आणि गतिशीलतेसाठी खालीलप्रमाणे सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

- स्मार्ट रोड आणि गतिशीलता सुधारणा कार्यक्रम
- रस्त्यांची पूर्णपणे स्मार्ट पुनर्रचना
- एकात्मिक उपयुक्तता वाहिनी (Integrated Utility ducting)
- पर्जन्य जलवाहिन्या (Storm water drains)
- स्मार्ट फूटपाथ (सार्वत्रिक प्रवेशयोग्यता)
- स्मार्ट क्रॉसिंग आणि सिग्नल
- मिरारोड आणि भाईंदरच्या मुख्य भागात "मॉडेल कम्प्लीट स्ट्रीट्स" चा पथदर्शी प्रकल्प.

यामुळे नागरी मालमत्तेचे आयुषमान वाढून त्याची उपयुक्तता व परिणाम नागरिकांना दिसून येईल.

**२. शहरी पूर नियंत्रण आणि पर्जन्य जल सुधारणा**

- GIS-आधारित पावसाळी पाण्याचा सूक्ष्म-निचरा व मॅपिंग
- वारंवार पूर येणाऱ्या भागात पंपिंग स्टेशन उभारणे
- आउटफॉल्समध्ये फ्लॅड गेट्स बसविणे
- पाण्याच्या पातळीवर लक्ष ठेवण्यासाठी स्मार्ट सेन्सर

यामुळे पावसाळ्यातील पाण्याच्या समस्येवर नियंत्रण मिळवता येईल.

**३. पादचारी सुविधा आणि नागरी क्षेत्र विकास**

- स्थानक परिसर पादचारी सुलभ मार्ग
- अर्बन प्लाझा आणि संरक्षित पादचारी पथ
- स्मार्ट स्ट्रीट फर्निचर - बेंचेस आणि फुटपाथवरील दिवे आणि सीसीटीव्ही (CCTV).

**४. मुख्य इमारत व सर्व प्रभाग कार्यालयांचे नूतनीकरण**

- स्मार्ट एंट्री सिस्टम
- स्मार्ट केबिन

**५. सौर उर्जा सुविधा**

- शाळा, रुग्णालये व महानगरपालिकेच्या इमारतींवर सौर छप्पर (Solar Rooftops)
- सौर ऊर्जेवर चालणारे पथदिवे

सौर ऊर्जा सुविधेमुळे वीज बिलात बचत आणि 'ग्रीन सर्टिफिकेशन' (हरित प्रमाणपत्र)

**६. स्वच्छतागृहामध्ये स्मार्ट पेमेंट सिस्टम (Smart Payment System) कार्यान्वीत करणे.**

**७. कार्यालयावर आणि मालमत्तांवर डिजिटल फलक आणि बोर्ड**

- लता मंगेशकर नाट्यगृह, कलादालन, प्रमोद महाजन हॉल, धर्माधिकारी हॉल, मीनाताई ठाकरे हॉल व अन्य ठिकाणी डिजिटल फलक आणि बोर्ड बसविणे.

**८. पाणी आणि सांडपाणी (Water & Wastewater)**

- टर्शिअरी ट्रिटमेंटचा विस्तार
- टर्शिअरी ट्रिटमेंट प्रक्रियेसाठी विद्यमान सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांचे (STPs) आधुनिकीकरण करणे
- पाण्याच्या पुनर्वापरासाठी पाइपलाइनद्वारे बागा, बांधकाम व उद्योग यांना पाणीपुरवठा करणे.
- फायदा: गोड्या पाण्यावरील अवलंबित्व कमी होईल.

**९. स्मार्ट पाणी वितरण नेटवर्क**

- डिस्ट्रिक्ट मीटर एरिया आणि स्काडा (SCADA) आधारित देखरेख
- गळती शोधण्याचे तंत्रज्ञान
- फायदा: दीर्घकाळात नॉन-रेव्हेन्यू वॉटर (NRW) मध्ये 15-25% घट

**१०. घनकचरा व्यवस्थापन (Solid Waste Management)**

- ए.आय. (AI) सक्षम स्मार्ट कचरा मॉनिटरिंग विस्तार
- क्यूआर (QR) कोड आधारित ट्रॅकिंगचा विस्तार (पुरस्कार प्राप्त मॉडेल)
- एआय (AI) विश्लेषण डॅशबोर्ड:
    - वाहनांच्या मार्गाचे ऑप्टिमायझेशन
    - संकलन पूर्तता स्कोअरिंग
- मोठ्या कचरा उत्पादकांसाठी आरएफआयडी (RFID) सक्षम डबे

**११. एकात्मिक कचरा वर्गीकरण आणि प्रक्रिया केंद्र**

- स्वयंचलित वर्गीकरण
- प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि प्रक्रिया संकुल
- बांधकाम आणि पाडकाम (C&D) कचरा पुनर्प्राप्ती युनिट
- फायदा: घनकचरा व्यवस्थापनाचे रूपांतर खर्चाकडून महसूल मॉडेलमध्ये करणे

**१२. जमीन सुधारणा (Land Reclamation)**

- गतिमान बायोमायनिंग
- बायोमायनिंग केल्याने उपलब्ध जमिनीचा अर्बन फॉरेस्ट (शहरी जंगल), सोलर पार्क व मनोरंजनासाठी हरित क्षेत्र (Recreational green zone) म्हणून वापर करणे.

**१३. माहिती व तंत्रज्ञान विभाग**

- डिजिटल ट्विन (व्हिजन प्रोजेक्ट)
- जीआयएस (GIS) आधारित डिजिटल शहर मॉडेल
- पायाभूत सुविधा नियोजन + आपत्ती सिम्युलेशन
- युनिफाइड सिटीझन सर्व्हिस प्लॅटफॉर्म
    - एकाच ॲपद्वारे तक्रारी, मालमत्ता कर, पाण्याची बिले व कचरा व्यवस्थापन ट्रॅकिंग
- स्मार्ट कमांड आणि कंट्रोल सेंटर विस्तार
- महानगरपालिका कार्यालय आणि प्रभाग कार्यालयांमध्ये व्हीसी (VC) सुविधा

**१४. शिक्षण आणि आरोग्य (Education & Health)**

- स्मार्ट क्लासरूम्स
- सर्व शाळांसाठी क्रीडा पायाभूत सुविधा
- डिजिटल लॅब
- डिजिटल नागरी आरोग्य केंद्र
- टेलिमेडिसिन

**१५. उद्यान विभाग (Garden Department)**

- दिव्यांगांसाठी प्रवेश सुविधा असलेले सर्वसमावेशक उद्यान आणि उद्याने
- सुलभ डिझाइन
- ओपन जिम
- वेलनेस झोन (Wellness Zones)

**१६. महिला व बालकल्याण विभाग (Women & Child Welfare Department)**

- महिला लखपती योजना - मिरा भाईंदर शहरात आजपर्यंत एकूण ९ पैकी ७ महापौर महिला झालेल्या आहेत. त्याअनुषंगाने महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्या व्हीजननुसार सर्व महिलांना लखपती बनविण्यासाठी, महिला व बालकल्याण विभागामार्फत विशेष प्रयत्न करणार आहोत.

**आभार :**

भारताचे मा. पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील 'स्वच्छ भारत अभियान', 'अमृत योजना' इत्यादी माध्यमातून मिरा भाईंदर शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने जे योगदान दिले आहे त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो.

महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री व दोन्ही मा. उपमुख्यमंत्री, मा. पालकमंत्री, मा. परिवहन मंत्री, मा. खासदार, मा. आमदार, मा. मुख्य सचिव, मा. आयुक्त (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण), नगर विकास विभागाचे मा. प्रधान सचिव (1) व (2) व शासनातील अधिकारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. स्थायी समिती सभापती, इतर समित्यांचे सभापती व उपसभापती आणि सर्व सन्माननीय सदस्य यांची महानगरपालिकेच्या सुनियोजित विकासासाठी सकारात्मक भूमिका राहिली आहे, त्यासाठी त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

मिरा भाईंदर शहरातील सर्व वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्यांचे पत्रकार प्रतिनिधी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचा आभारी आहे. महानगरपालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी व लेखा विभागाचे कर्मचारी, इतर अधिकारी व कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचे आभार व्यक्त करतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!

**संभाजी पानपट्टे, मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्माननीय सभापती, स्थायी समिती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९७ अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचे 'ब' अंदाजपत्रक आपणांसमोर सादर करीत आहे. मिरा- भाईंदर शहरासाठी परिवहन सेवा ही मुलभूत सेवा असून, सद्यस्थितीत परिवहन सेवेकडे ७४ डिझेलवर चालणाऱ्या व ५७ इलेक्ट्रीक बसेस अशा एकूण १३१ बसेस प्रवर्तनासाठी उपलब्ध आहेत. बसेस चालविण्यासाठी महानगरपालिकेने Gross Cost Contract (GCC) तत्त्वावर दोन स्वतंत्र बस ऑपरेटर यांची नियुक्ती केलेली आहे. तसेच तिकीट संकलन/पर्यवेक्षण, देखरेख इत्यादीसाठी स्वतंत्र एजन्सी नियुक्त केलेली आहे. मिरा -भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी मौजे घोडबंदर येथे अदयावत बस डेपो आहे. यामध्ये बस निगा/दुरुस्ती कार्यशाळा, कार्यशाळेसाठी आवश्यक Depot Equipment, अद्ययावत ITS यंत्रणेसह Command & Control Center उभारण्यात आलेले आहे. Electronic Ticketing सुविधां उपलब्ध करून देण्यात आलेली असुन "MAJHI BUS" मोबाईल ॲप सुरू करण्यात आलेले आहे. तसेच UPI सुविधा द्वारे कॅशलेस तिकीट सुविधा सुरू करण्यात आली आहे.

महानगरपालिकेकडून परिवहन उपक्रमास' अर्थसहाय्य मिळणे आवश्यक आहे. आगामी आर्थिक वर्षामध्ये क्रेंद्र शासनाचे PM-eBus Sewa प्रकल्पांतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी १०० e-Bus मंजूर झालेल्या आहेत. या योजनेतंर्गत बस प्रवर्तनासाठी क्रेंद्र शासनाकडून पुढील १० वर्षे सहाय्यक अनुदान प्राप्त होणार असून सदर योजनेतंर्गत डेपोसाठीदेखील अनुदान मंजूर असुन दोन डेपोची कामे अंतिम टप्प्यात आहेत. तसेच परिवहन सेवेसाठी ITMS यंत्रणा कार्यान्वीत असून काळानुरूप ही यंत्रणा अद्यावत करणे आवश्यक आहे. त्याकरीता केंद्र शासनाचे रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडून ITMS यंत्रणा अधिक सक्षम, प्रवाशांच्या सोयीयुक्त करणेसाठी अनुदान मंजूर आहे. महानगरपालिकेची परिवहन सेवा सक्षम व अद्ययावत करणेचे आमच्या प्रयत्नांना मा. आयुक्त श्री. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांचे वेळेवेळी मार्गदर्शन लाभलेले आहे, त्याचा आवर्जुन उल्लेख करणे आवश्यक आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमावरील प्रवाशांच्या विश्वासामुळे परिवहन सेवेचा दररोज लाभ घेण्याऱ्या प्रवाशांचा १,००,००० चा टप्पा पार केला आहे. तसेच मिरा भाईदर महानगरपालिकेच्या सन्मा महापौर मा.श्रीमती.डिंपल मेहता, मा.उपमहापौर मा.श्री.ध्रुवकिशोर पाटिल, मा.सभापती - स्थायी समिती मा.श्री.हसमुख गेहलोत, मा.महानगरपालिका सदस्य तसेच महानगरपालिका प्रशासनाचे सहकार्य वेळोवेळी लाभलेले आहे. यापुढेही लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो व सर्वांचे आभार मानतो

**मा. सभापती :-**

आज मा. आयुक्त महोदय राधाबीनोद शर्माजी यांनी सन-२०२५-२६ चे सुधारीत व सन-२०२६-२७ चे मिरा भाईंदर महानगरपालिकाचे मुळ अंदाजपत्रक जे स्थायी समितीला सादर केलेले आहे व त्याच बरोबर अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे साहेब यांनी सन-२०२५-२६ चे सुधारीत व सन-२०२६-२७ मुळ अंदाजपत्रक सादर केलेले आहेत म्हणून मा. आयुक्त महोदय व अतिरिक्त आयुक्त यांचे सर्व सदस्यांकडून व माझ्याकडून मनापासून धन्यवाद. ह्या अर्थसंकल्पावर स्थायी समिती व सदस्य सर्व विभागावरील पुढील चर्चा दोन दिवस करणार आहेत. ह्या चर्चेमध्ये सर्व सदस्य व अधिकारी हजर रहावे अशी विनंती आहे पुढचे शेड्यूल ते सचिव महोदय आपल्याला सांगतील.

**महापालिका सचिव :-**

मा. सभापतीच्या परवानगीने अर्थकंल्पावार चर्चा करण्या करीता खालीलप्रमाणे वेळेचे नियोजन केलेले आहे.

| दिनांक | अ.क्र. | वेळ | विभाग | जमा / खर्च बाजू |
|---|---|---|---|---|
| दि. ११ मार्च, २०२६ | १) | स. १०.३० वा. | आस्थापना / सामान्य प्रशासन विभाग | जमा / खर्च बाजू |
| | २) | स. ११.०० वा. | निवडणूक व जनगणना विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ३) | स. ११.१५ वा. | घनकचरा व्यवस्थापन व घनकचरा प्रकल्प विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ४) | स. ११.३० वा. | अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विभाग | जमा / खर्च बाजू |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ५) | स. ११.४५ वा. | अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विगाग | जमा / खर्च बाजू |
| | ६) | दु. १२.१५ वा. | विधी विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ७) | दु. १२.३० वा. | क्लस्टर डेव्हलपेंट विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ८) | दु. १.०० वा. | पशु संवर्धन विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ९) | दु. १.१५ वा. | अभिलेख विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १०) | दु. २.३० वा. | सार्व. आरोग्य विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ११) | दु. ३.०० वा. | उद्यान विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १२) | दु. ३.१५ वा. | जाहिरात विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १३ | दु. ३.३० वा. | पर्यावरण विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १४) | सायं. ४.०० वा. | ग्रंथालय विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १५) | सायं. ४.१५ वा. | परवाना विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १६) | सायं. ४.३० वा. | शिक्षण विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १७) | सायं. ५.०० वा. | समाज विकास / कला क्रिडा व सांस्कृतीक विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १८) | सायं. ५.३० वा. | महिला व बालकल्याण विभाग | जमा / खर्च बाजू |
| दि. १२ मार्च, २०२६ | १) | स. १०.३० वा. | मालमत्ता कर विभाग | जमा / खर्च बाजू |
| | २) | स. ११.०० वा. | परिवहन विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ३) | स. ११.३० वा. | वाहन व यांत्रिकी विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ४) | दु. १२.०० वा. | मध्यवर्ती भांडार विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ५) | दु. १२.३० वा. | बाजार लिलाव विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ६) | दु. १.०० वा. | सुरक्षा विभाग / भुई भाडे विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ७) | दु. २.३० वा. | पे ॲण्ड पार्क विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ८) | दु. ३.०० वा. | माहिती व तंत्रज्ञान / माहिती जनसंपर्क | जमा / खर्च बाजू |
| | ९) | दु. ३.३० वा. | ई-टेंडरींग व C.C.T.V यंत्रणा विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १०) | सायं. ४.०० वा. | सचिव विभाग | जमा / खर्च बाजू |
| | ११) | सायं. ४.१५ वा. | नगररचना विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १२) | सायं. ४.४५ वा. | पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभाग | जमा / खर्च बाजू |
| | १३) | सायं. ५.१५ वा. | सार्वजनिक बांधकाम / विद्युत / मिळकत विभाग | जमा / खर्च बाजू |

**मा. सभापती :-**

सचिव महोदय प्रत्येकाला त्याची कॉपी दिली तर अतिउत्तम होईल. आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :-सायं. ४.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**